# युवाराष्ट्र दर्शन

RNI No. MAHMAR/2008/26657 E-mail : yuvarashtradarshan.com

नागपूर, शनिवार, दिनांक १० जानेवारी २०२६ ■ वर्ष १७ ■ अंक ३१८ ■ पाने ८ ■ किंमत रु. २/– वितरण खर्च रु.१ = एकूण ३ रुपये


## संपादकीय

### अपक्षही जोमात

महापालिका निवडणुकीला अवघे चार दिवस राहिले आहेत. राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्षांच्या उमेदवारांशिवाय अपक्ष देखील मोठ्या प्रमाणात निवडणूक रिंगणात आहेत. मोठ्या पक्षाचे ठिक आहे. त्यांच्याकडे मातब्बर नेते आणि कार्यकर्ते आहेत. परंतु, अपक्षांकडे काय? मात्र, कधी नव्हे, ते यंदा अपक्षांनी आपली कंबर कसली आहे. अपक्ष उमेदवारांनी पक्षाकडे उमेदवारी मागितली होती. त्यांच्या मुलाखती झाल्या होत्या. मुलाखतीत त्यांना निवडणुकीत तुम्ही किती खर्च करणार असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर या उमेदवारांचे उत्तरही तेवढेच मार्मिक होते. साहेब पैशाने निवडणुका जिंकता येत नाही. त्यासाठी वार्डात तुमचे काम दिसले पाहिजे असे सडेतोड उत्तर दिले होते. मुलाखत देणाऱ्या उमेदवारांकडे पाहता पक्षाने त्यांना उमेदवारी नाकारली. त्यामुळे त्यांनी अपक्ष म्हणून आपली उमेदवारी दाखल केली. अपक्षांनी देखील आपला प्रचार जोमात सुरू केला आहे. रोज सकाळी शंभर दीडशे कार्यकर्त्यांसह अपक्ष उमेदवार लोकांच्या घरी जाऊन मते मागत असल्याचे चित्र संपूर्ण शहरात दिसून येत आहे. त्यातच त्यांनी ई रिक्षा देखील बुक केले आहेत. ई रिक्षावर आपले बॅनर लाऊन लाऊडस्पिकरच्या माध्यमातून ते आपला प्रचार करीत आहेत. शहरात सध्या थंडीचे दिवस आहेत. त्यामुळे सकाळी कुणीही सहसा बाहेर निघत नाहीत. मात्र, अपक्ष आपले ढोलताशे घेत आणि नारे निदर्शने करीत जोमात आपला प्रचार करीत आहेत. ढोल ताशांचा आवाज आला की, साखरझोपेत असलेले लोकही झोपेतून जागे होतात. एकंदरीत अपक्ष सुद्धा हम किसीसे कम नही असे म्हणत निवडणुकीत रिंगणात दंड थोपटून आहेत.

# ५० खोके एकदम ओके :

## भाजप पदाधिकाऱ्यांची शिंदेसेनेविरोधात घोषणा

### मुंबईत महायुतीतील अंतर्गत संघर्ष चव्हाट्यावर

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी

मुंबई, दि. ९

छत्रपती संभाजीनगर आणि पुण्यात भाजप व शिंदे गटातील शिवसेना यांच्यातील युती तुटल्यानंतर दोन्ही पक्षांमध्ये तणाव निर्माण झाला होता. हा तणाव आता थेट मुंबईतही उफाळून आला आहे. मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत एकत्र लढणारे हे दोन्ही मित्रपक्ष प्रत्यक्ष रस्त्यावर आमनेसामने आल्याचे चित्र शुक्रवारी पाहायला मिळाले. मुंबईतील वॉर्ड क्रमांक १७३ मध्ये प्रचारादरम्यान भाजप आणि शिंदे सेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये जोरदार वाद झाला, ज्यामुळे मतदानाच्या काही तास आधीच राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. या घटनेमुळे महायुतीतील अंतर्गत विसंवाद पुन्हा एकदा उघडपणे समोर आला असून, राजकीय वर्तुळात याची जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

वॉर्ड क्रमांक १७३ मध्ये भाजपच्या शिल्पा केळुस्कर आणि शिंदे सेनेच्या पूजा कांबळे यांच्यात मैत्रीपूर्ण लढत होत आहे. शुक्रवारी सकाळी दोन्ही




उमेदवारांचे प्रचार फेरी सुरू असताना दोन्ही पक्षांचे कार्यकर्ते एकाच परिसरात एकत्र आले. सुरुवातीला वातावरण शांत होते, मात्र अचानक भाजपच्या काही कार्यकर्त्यांनी माईकवरून ५० खोके एकदम ओके अशा घोषणा देण्यास सुरुवात केली. आतापर्यंत ठाकरे गटाकडून शिंदे गटाला डिवचण्यासाठी वापरली जाणारी ही घोषणा आता थेट मित्रपक्षाच्या कार्यकर्त्यांकडून दिली गेल्याने शिंदे सेनेच्या कार्यकर्त्यांचा संताप अनावर झाला. त्यानंतर दोन्ही बाजूंनी एकमेकांविरोधात जोरदार घोषणाबाजी सुरू झाली.

या घोषणाबाजीमुळे काही वेळातच प्रचाराचे वातावरण तणावपूर्ण बनले. शिंदे गटाच्या कार्यकर्त्यांनी भाजपविरोधात प्रत्युत्तरात्मक घोषणा देत नाराजी व्यक्त केली. मित्रपक्षाकडूनच अशा प्रकारची भाषा वापरली जात असल्याने आम्हाला अपमानित केल्याची भावना निर्माण झाली, अशी प्रतिक्रिया अनेक शिंदे समर्थकांकडून व्यक्त करण्यात आली. या संपूर्ण घटनेचा व्हिडीओ काही वेळातच सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, मतदानाला अवघे काही तास शिल्लक असताना घडलेल्या या प्रकारामुळे मुंबईतील निवडणूक प्रचाराला वेगळेच वळण लागले आहे. राजकीय विश्लेषकांच्या मते, या घटनेचा परिणाम मतदारांच्या मानसिकतेवरही होऊ शकतो.

या वादामागची पार्श्वभूमी पाहिली असता, भाजपशिवसेना यांच्यातील जागावाटपातील गुंतागुंत पुन्हा समोर येते. वॉर्ड क्रमांक १७३ हा अधिकृत जागावाटपानुसार शिंदे सेनेला सुटलेला होता. त्यानुसार शिंदे गटाने पूजा कांबळे यांना अधिकृत उमेदवारी दिली. मात्र, भाजपच्या शिल्पा केळुस्कर यांनीही भाजपचा कलर झेरॉक्स असलेला एबी फॉर्म जोडून उमेदवारी अर्ज दाखल केला होता आणि तो अर्ज वैध ठरला. त्यामुळे दोन्ही पक्षांना नाईलाजाने या वॉर्डमध्ये मैत्रीपूर्ण लढतीला सामोरे जावे लागले. सुरुवातीला ही लढत सौहार्दपूर्ण राहील, असे संकेत होते, मात्र प्रत्यक्ष प्रचार सुरू झाल्यानंतर 'दोस्तीत कुस्ती'चे चित्र स्पष्टपणे दिसू लागले आहे.

## मकरसंक्रांतीची मोठी भेट की आदर्श आचारसंहितेचा भंग?

### मतदानाच्या तोंडावर 'लाडकी बहीण'च्या खात्यात ३ हजार



युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी

मुंबई, दि. ९

राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीच्या अगदी तोंडावर 'लाडकी बहीण' योजनेअंतर्गत महिलांच्या खात्यात एकत्र ३ हजार रुपये जमा होणार असल्याची घोषणा झाल्याने राजकीय वातावरण तापले आहे. मकरसंक्रांतीची 'मोठी भेट' म्हणून हा निर्णय पुढे आणला जात असला, तरी मतदानाच्या अगदी आधी थेट बँक खात्यात पैसे टाकणे म्हणजे आदर्श आचारसंहितेचा भंग नाही का? असा थेट आणि तीव्र सवाल आता उपस्थित होऊ लागला आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीसाठी गेमचेंजर ठरलेली लाडकी बहीण योजना आता महापालिका निवडणुकीतही प्रचाराचा केंद्रबिंदू बनली आहे. या योजनेतून महिलांना दरमहा १,५०० रुपये दिले जातात. हे पैसे कधी द्यायचे, कोणत्या दिवशी द्यायचे, हप्ते एकत्र की वेगवेगळे द्यायचे, याचा सर्वस्वी अधिकार सत्ताधारी सरकारकडे असतो. मात्र निवडणूक जाहीर असताना, प्रचार सुरू असताना आणि मतदानाच्या एक दिवस आधी हा निर्णय घेणे लोकशाही संकेतांशी सुसंगत आहे का? असा प्रश्न आता अधिक ठळकपणे पुढे येत आहे.

याआधी नोव्हेंबर व डिसेंबरचे दोन हप्ते एकत्र मिळतील, अशी अपेक्षा असताना अनेक महिलांच्या खात्यात केवळ १,५०० रुपयेच जमा झाल्याने नाराजी होती. त्यानंतर आता अचानक दिलासा देत डिसेंबर आणि जानेवारी महिन्याचे ३,००० रुपये १४ जानेवारीपूर्वी जमा होतील, अशी घोषणा यांनी केली. विशेष म्हणजे, ही घोषणा करताना त्यांनी सोशल मीडियावर ट्वीट केले देवाभाऊंकडून लाडक्या बहिणींना मकरसंक्रांतीची मोठी भेट! १४ जानेवारीपूर्वी लाडक्या बहिणींच्या बँक खात्यात डिसेंबर व जानेवारी महिन्याचे ३,००० रुपये जमा होणार.

## मुंबईतील ११ प्रभागात सरळ लढत

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी

मुंबई, दि. ९

मुंबई महापालिका निवडणुकीच्या प्रचाराला जोर चढला असून मुंबईतील २२७ पैकी ११ प्रभागात सरळ लढत होत आहे. या वन टू वन लढतींमुळे येथील निवडणूक लक्षवेधी ठरली आहे. ११ पैकी ३ प्रभागात शिवसेनेच्या ठाकरे गट विरुद्ध शिंदे गट अशी चुरस होत आहे. तर अन्य तीन ठिकाणी ठाकरे गट आणि भाजप आमने सामने आहेत. यंदा मुंबई महापालिका निवडणुकीत १ हजार ७०० उमेदवार आपले नशीब आजमावत आहेत. निवडणूक आखाड्यात भाजप-शिवसेना -रिपब्लिकन आठवले गट यांची महायुती, शिवसेना ठाकरे गट- महाराष्ट्र नवनिर्माण सेना-राष्ट्रवादी शरद पवार गट आणि काँग्रेस-वंचित बहुजन या तीन प्रमुख आघाड्या एकमेकांच्या समोर उभ्या ठाकल्या आहेत. याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार, समाजवादी पक्ष, एमआयएम हे पक्ष स्वबळावर निवडणूक रिंगणात आहेत. त्यामुळे काही ठिकाणी तिरंगी, चौरंगी आणि पंचरंगी लढती होत आहेत.

प्रभाग क्रमांक १९१ मध्ये शिंदे गटाचे माजी आमदार सदा सरवणकर यांची कन्या प्रिया सरवणकर आणि ठाकरे गटाच्या विशाखा राऊत यांच्यात जोरदार लढत होत आहे. प्रिया या पहिल्यांदा निवडणूक रिंगणात उतरल्या आहेत.

# राज ठाकरे सर्वात मोठ्या पराभवाचे धनी ठरतील: देवेंद्र फडणवीस

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी

मुंबई, दि. ९

मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण दिवसेंदिवस अधिकच तापत चालले आहे. अशातच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मनसेप्रमुख राज ठाकरे यांच्याबाबत केलेल्या एका खळबळजनक वक्तव्यामुळे नव्या राजकीय वादाला तोंड फुटले आहे. एका हिंदी वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरे केवळ पराभूत होणार नाहीत, तर इतिहासात सर्वात मोठ्या पराभवाचे धनी म्हणून ओळखले जातील, अशी थेट भविष्यवाणी केली. निकाल आल्यानंतर हे चित्र



स्पष्ट होईल, असेही त्यांनी ठामपणे सांगितले. या वक्तव्यामुळे बीएमसी निवडणुकीच्या आधीच राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या मुलाखतीत स्पष्ट शब्दांत सांगितले की, आज राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येत असले तरी या युतीला आता कोणतेही राजकीय महत्त्व उरलेले नाही. त्यांच्या मते, जर २००९ सालीच शिवसेना आणि मनसे एकत्र आले असते, तर महाराष्ट्राची राजकीय परिस्थिती आज वेगळी असती. त्या काळात या युतीला मोठ्या प्रमाणात मतदारांचा पाठिंबा मिळाला असता. मात्र आता वेळ निघून गेली असून, दोन्ही नेत्यांकडे पूर्वीसारखी मतांची ताकद राहिलेली नाही, असा दावा फडणवीस यांनी केला. विशेषतः मनसेबाबत बोलताना त्यांनी अत्यंत परखड मत मांडले.

राज ठाकरे यांच्या राजकीय भवितव्यावर भाष्य करताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, या निवडणुकीनंतर राज ठाकरे यांचा आतापर्यंतचा सर्वात मोठा पराभव होणार आहे. या युतीचा फायदा उद्धव ठाकरे यांना होऊ शकतो, मात्र राज ठाकरे यांना त्यातून काहीही मिळणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. राज ठाकरे यांच्या मतांचा आधार आता संपलेला असून, त्यांची भूमिका या युतीत दुय्यम ठरेल, असेही फडणवीस म्हणाले. त्यामुळे राज ठाकरे केवळ निवडणूक हरतील असे नाही, तर इतिहासात सर्वात मोठ्या पराभवाची नोंद त्यांच्या नावावर होईल, ही माझी ठाम भविष्यवाणी आहे, असे सांगत त्यांनी राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली.

याच मुलाखतीत देवेंद्र फडणवीस यांनी उद्धव ठाकरे यांच्यावरही जोरदार टीका केली.

## रावण आला तरी भाजपावाले त्याला पक्षात घेतील : उद्धव ठाकरे

नाशिक, दि. ९

महानगरपालिकेच्या पार्श्वभूमीवर भाजपाने विरोधी पक्षातील अनेक नेत्यांना पक्षप्रवेश देऊन निवडणुकीचे तिकीट दिले. भाजपाच्या या धोरणावर खुद्द भाजपाच्या निष्ठावंतांनी नाराजी व्यक्त केली आहे. याच मुद्द्यावरून आता शिवसेनेचे (ठाकरे) नेते उद्धव ठाकरे यांनी नाशिकच्या सभेत भाजपावर जोरदार टीका केली.



नाशिक येथे आज उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची पहिली संयुक्त सभा पार पडली. या सभेत दोघाही भावांनी भाजपावर टीकास्त्र सोडले. काही दिवसांपूर्वी नाशिकमध्ये दोन्ही पक्षातील अनेक नेत्यांना भाजपामध्ये प्रवेश देण्यात आला होता. यावरून उद्धव ठाकरेंनी भाजपावर टीका केली.

उद्धव ठाकरे म्हणाले, ''भाजपा हा उपटसुभांचा पक्ष झाला आहे. गेल्यावेळी नाशिकमध्ये आमच्या व्यासपीठावर असलेली माणसे तिकडे गेल्याचे कळले. पण आज आल्यानंतर पाहतो, तर व्यासपीठ तितकेच भरलेले आहे. आमच्याकडे पोरांचा तोटा नाही. अस्सल निष्ठावंत आजही आमच्याकडे आहेत. आम्ही मोठी केलेली माणसे गेली असतील पण ज्यांनी त्यांना मोठे केले, ती सामान्य माणसे आमच्याबरोबर आहेत.

''टीव्हीवर आज भाजपावाले माझे भाषण चोरून बघत असतील. त्यांना मला विचारायचे आहे की, तुमच्या नशीबी काय जगणे आले. उपटसुभांच्या सतरंज्या तुम्हाला उचलाव्या लागत आहेत. आमच्यात होते, तेव्हा तुम्ही भ्रष्टाचाराचे आरोप करत होतात. सलीम कुत्ताचा साथीदार असल्याचा आरोप एकावर केला होता. पक्ष वाढविण्यासाठी तुम्हाला कुत्ता, बिल्ली सर्व चालते. बरबटलेली माणसे पक्षात घेऊन त्यांचे लंगोट वगैरे धुवून त्यांना डोक्यावर घेऊन नाचायचे, हे भाजपाच्या निष्ठावंतांच्या नशीबी आले आहे'', अशी टीका उद्धव ठाकरे यांनी केली.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले, आम्ही एकत्र आल्यानंतर ज्यांनी फटाके फोडले, ते दुसऱ्या दिवशी तिकडे गेले. भाजपाच्या आमदार देवयानी फरांदे यांनीच यावरून भाजपावर टीका केली. भाजपा उपऱ्यांचा पक्ष असल्याचे त्या म्हणाल्या. तिकडे सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, शनी सिंगणापूर आणि भाजपाला दरवाजेच नाहीत. पण शनी सिंगणापूरला जातात ते संकटग्रस्त असतात आणि भाजपात येणारे ईडी, सीबीआय, इन्कम टॅक्स ग्रस्त येत आहेत. चोर, दरोडेखोर येत आहेत. ज्या रामाने रावणाचा वध केला, तो रावण जरी आला तरी त्यालाही पक्षप्रवेश देतील. इतके हे निर्लज्ज झाले आहेत.

## तरोडी येथे ११.७५ लाखांची घरफोडी

नागपूर, दि. ९

तरोडी (ता.कामठी) येथे राहणाऱ्या राकेश लक्ष्मण इंगळे (३५) यांच्याकडे घरफोडी करून अज्ञात चोरांनी ११ लाख ७५ हजाराचा ऐवज चोरून नेला.

काल गुरूवारी दुपारी १२.३० च्या सुमारास राकेश इंगळे हे त्यांच्या मुलासह दिघोरी येथे आईवडिलांच्या घरी गेले होते. पहिल्या मजल्यावर राहणारा त्यांचा भाऊ शेतात आणि इंगळे यांची पत्नी व वहिनी बाजारात खरेदीसाठी गेल्या होत्या. ही संधी साधून अज्ञात चोरांनी मुख्य दाराचा कुलूपकोंडा तोडून घरात प्रवेश केला आणि बेडरूममधील लाकडी दिवानमध्ये ठेवलेले ११ लाख ७५ हजार रुपये चोरून नेले.

## बिबट्याचा हल्ल्यात चिमुकल्याचा मृत्यू

चित्रा कापसे

तिरोडा, दि. ९

तालुक्यातील खडकी (डोंगरगाव) येथे आज सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. बिबट्याने चार वर्षांच्या चिमुकल्यावर हल्ला करून त्याला घरातून उचलून नेले, या हल्ल्यात त्या चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या चिमुकल्याचे नाव हियांश शिवशंकर रहांगडाले (वय ४) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, हियांश हा आपल्या आई-वडिलांसोबत घराच्या मागील अंगणात चुलीजवळ बसलेला होता. त्याच वेळी दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक हल्ला चढवत चिमुकल्याला उचलून नेले. पालकांनी आरडाओरड करत बिबट्याचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. काही वेळाने चिमुकल्याचा मृतदेह आढळून आला.

या घटनेनंतर गावात प्रचंड संतापाची लाट उसळली असून भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, बातमी लिहितपर्यंत वन विभाग व पोलीस प्रशासन अद्याप घटनास्थळी दाखल झालेले नव्हते. खडकी व परिसरात बिबट्याचा मुक्त संचार वाढला असून याआधीही अनेकदा ग्रामस्थांनी वन विभागाकडे तक्रारी केल्या होत्या. मात्र, वेळेवर ठोस उपाययोजना न झाल्याने आज एका निष्पाप जीवाला प्राण गमवावा लागल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

या दुर्दैवी घटनेमुळे रहांगडाले कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण गाव शोकसागरात बुडाले आहे. प्रशासनाने तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करावा, पीडित कुटुंबाला तात्काळ मदत व नुकसानभरपाई द्यावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे

## बस दरीत कोसळून आठ प्रवासी ठार

वृत्तसंस्था

सिरमौर, दि. ९

हिमाचल प्रदेशातील सिरमौर जिल्ह्यातील हरिपूरधार येथे शुक्रवारी दुपारी तीनच्या सुमारास खाजगी बस खोल दरीत कोसळल्याने ८ प्रवाशांचा मृत्यू झाला, तर अनेक प्रवासी जखमी झाले.

जीत कोच ही खाजगी बस कुपवीहून सिमल्याला जात होती. बसमध्ये सुमारे ४० प्रवासी होते. हरिपूरधार बाजार परिसरातून सिमल्याच्या दिशेने बस निघाल्यानंतर काही अंतरावरच चालकाचा बसवरील ताबा सुटला आणि बस खोल दरीत कोसळली. अपघाताची माहिती मिळताच पोलिस अधीक्षक एन. एस. नेगी, अतिरिक्त अधीक्षक योगेश रोल्टा घटनास्थळी दाखल झाले. संग्राह, राजगड आणि दादाहू येथून बचाव पथके घटनास्थळी पाठविण्यात आली. वृत्त लिहीपर्यंत ५ प्रवाशांना मृतावस्थेत बाहेर काढले होते. मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता असल्याचे रोल्टा यांनी सांगितले.

# एकनाथ शिंदेंची 'एआयएमआयएम'सोबत युती

युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी

मुंबई, दि. ९

अकोटमध्ये भाजप आणि युतीच्या चर्चेने राजकीय धुरिणांना हादरा दिला असतानाच, बीड जिल्ह्यातील परळीमध्ये उभ्या राहिलेल्या नव्या सत्तासमीकरणाने महाराष्ट्राच्या राजकारणात आणखी एक खळबळ उडवली आहे. येथे थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने एमआयएमला सोबत घेत आपला गट स्थापन केल्याने, सत्तेचा खेळ अधिकच गुंतागुंतीचा झाला आहे.

परळी नगरपरिषदेत घडलेले हे राजकीय नाट्य केवळ स्थानिक पातळीपुरते मर्यादित राहिलेले नाही. हिंदुत्वाच्या मुद्द्यावर सत्ताधारी महायुतीवर सातत्याने टीका करणाऱ्या विरोधकांना शब्दांचे धारदार अस्त्र मिळाले आहे. अकोट व अंबरनाथमधील प्रकरणे अजूनही



शांत होत नाहीत, तोवर परळीत एमआयएमला सोबत घेण्याचा निर्णय घेतल्याने राजकारण पुन्हा एकदा तापले आहे.

परळी नगरपरिषदेत एकूण ३५ नगरसेवक आहेत. या नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदी आधीच राष्ट्रवादी काँग्रेसचा विजय झालेला आहे. आता नगरपरिषदेत गटनेत्याची निवड करण्यासाठी राष्ट्रवादी आणि शिवसेना यांनी ताकद एकत्र केली. विशेष म्हणजे, या प्रक्रियेत त्यांनी एमआयएमच्या एका नगरसेवकासह काही अपक्ष नगरसेवकांनाही सोबत घेतले.

या नव्या युतीत राष्ट्रवादी काँग्रेसचे १६, शिवसेनेचे २, एमआयएमचा १ आणि ४ अपक्ष असे एकूण २४ नगरसेवक एकत्र आले आहेत. या सत्तागटाचे नेते म्हणून राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष वैजनाथ सोळंके यांची निवड करण्यात आली आहे. संख्याबळाच्या जोरावर नगरपरिषदेत सत्ता अधिक भक्कम करण्याचा हा प्रयत्न असल्याचे सत्ताधाऱ्यांकडून सांगितले जात असले, तरी त्याची राजकीय किंमत मोठी ठरण्याची शक्यता आहे.

विरोधकांनी मात्र या घडामोडींवर जोरदार टीकेची झोड उठवली आहे. ''सत्तेसाठी कोणाशीही हातमिळवणी करायला मागेपुढे पाहिले जात नाही; मग हिंदुत्वाच्या घोषणा नेमक्या कशासाठी?'' असा थेट सवाल उपस्थित केला जात आहे. अकोट, अंबरनाथ आणि आता परळीया तिन्ही ठिकाणच्या घटनांनी महायुतीच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उभे केले असल्याचे राजकीय विश्लेषकांचे म्हणणे आहे.

# ठाकरे गटाच्या जिल्हाध्यक्षांच्या घर व कार्यालयावर ईडीची धाड

नागपूर, दि. ९

राज्यातील २९ महापालिका निवडणुकांची रणधुमाळी शिगेला पोहोचलेली असतानाच शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला मोठा धक्का बसला आहे. मतदानाला अवघे सहा दिवस बाकी असताना नागपूर जिल्ह्यातील ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष उत्तम कापसे यांच्या घर व कार्यालयावर (ईडी) ने पहाटे धाड टाकल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.

नागपूर जिल्ह्यातील सावनेर, खापा आणि पाटणसावंगी परिसरात ईडीची जोरदार कारवाई सुरू असून, नागपूर व दिल्ली येथील ईडीच्या तब्बल १० पथकांनी एकाच वेळी छापेमारी केल्याची माहिती समोर आली आहे. पहाटे सुमारे ५ वाजल्यापासून सुरू झालेल्या या कारवाईमुळे संबंधित भागात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.या छापेमारीमागे २०२१ मधील रेती तस्करी आणि बेकायदेशीर रेती विक्री प्रकरण असल्याचे सांगितले जात आहे. चार वर्षांपूर्वी मध्य प्रदेशातून महाराष्ट्रात झालेल्या रेती विक्रीतील कथित गैरव्यवहाराचा तपास पुन्हा एकदा गती घेत असल्याचे संकेत मिळत आहेत. आर्थिक व्यवहारांची साखळी, व्यवहारातील मध्यस्थी आणि पैशांचा प्रवाहया साऱ्यांचा तपास ईडीकडून काटेकोरपणे सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून मिळत आहे. कारवाईदरम्यान सावनेरमध्ये प्रफुल्ल कापसे, उत्तम कापसे, विनोद गुप्ता, लक्ष्मीकांत सातपुते आणि दादू कोलते, तर पाटणसावंगी येथे शरद राय आणि मनोज गायकवाड, तसेच खापा येथे अमित राय यांच्या घर व कार्यालयांवर ईडीने छापेमारी केली आहे. कागदपत्रे, डिजिटल नोंदी आणि आर्थिक व्यवहारांची तपासणी सुरू असून, काही महत्त्वाची माहिती ताब्यात घेतल्याचीही चर्चा आहे.

ऐन निवडणुकीच्या तोंडावर ठाकरे गटाच्या जिल्हाध्यक्षांवर ईडीची धाड पडल्याने कारवाईच्या 'टायमिंग'वरून राजकीय चर्चांना उधाण आले आहे. विरोधकांकडून ''कायदा आपलं काम करतोय'' अशी प्रतिक्रिया येत असताना, ठाकरे गटाच्या गोटातून मात्र राजकीय दबावाखालील कारवाई असल्याचा सूचक आरोप केला जात आहे. ''निवडणुकीच्या तोंडावरच अशा धाडी का?'' असा सवाल उपस्थित केला जात असून, या कारवाईचा प्रचारावर आणि कार्यकर्त्यांच्या मनोबलावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. दरम्यान, ईडीकडून अद्याप अधिकृत निवेदन आलेले नसले, तरी तपास मनी ट्रेल आणि संबंधित व्यवहारांच्या कड्या जोडण्यावर केंद्रित असल्याचे समजते.

## भाजपच्या २६ बंडखोरांची सहा वर्षांसाठी हकालपट्टी

मुंबई, दि. ९

मुंबई महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजप-शिवसेना शिंदे गट महायुतीच्या उमेदवारांच्या विरोधात निवडणूक लढवणाऱ्या २६ बंडखोरांची भाजपने पक्षातून हकालपट्टी केली आहे. पक्षशिस्तीचा भंग करणाऱ्या या बंडखोरांना पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे. मुंबई भाजपचे अध्यक्ष अमित साटम यांनी ही कारवाई केली. मुंबई महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी येत्या १५ जानेवारीला मतदान होत आहे. या निवडणुकीसाठी भाजपने शिवसेना शिंदे गट आणि रिपब्लिकन पक्ष आठवले गट यांना सोबत घेतले आहे. या महायुतीमुळे भाजपला मित्र पक्षांना जागा सोडाव्या लागल्या. त्यामुळे उमेदवारी न मिळालेल्या भाजपच्या इच्छुकांनी बंडाचे निशाण फडकवत पक्षाच्या अधिकृत उमेदवाराच्या अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला आहे. मुंबईतील भाजपचे नेते आशिष शेलार, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड यांनी या बंडखोरांच्या भेटीगाठी घेऊन त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. मात्र, उमेदवारी मागे घेण्याची पक्षाची विनंती त्यांनी धुडकावून लावली. त्यामुळे अखेर भाजपने त्यांच्यावर कारवाईचा बडगा उचलला.

निलंबनाची कारवाई करण्यात आलेल्या भाजप बंडखोरांमध्ये दिव्या ढोले, नेहल अमर शहा, जान्हवी राणे, आसावरी पाटील, मोहन आंबेकर, स्नेहाली वाडेकर, धनश्री बगेल, प्रिया मर्गज, शोभा साळगावकर, सुचित्रा नाईक, उर्मिला गुप्ता आदींचा समावेश आहे.

भाजपच्या नेत्यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे काही बंडखोरांनी निवडणूक रिंगणातून माघार घेतली आहे. मात्र, माघारीचे प्रमाण तुलनेने कमी आहे. सुनीता यादव यांनी प्रभाग क्रमांक १ मधून अधिकृत उमेदवार रेखा यादव यांच्या विरोधात अर्ज भरला होता. मात्र, पक्षाच्या विनंतीनंतर त्यांनी तो मागे घेतला. प्रभाग क्रमांक २२१ मध्ये माजी नगरसेवक जनक संघवी यांनी भाजपचे अधिकृत उमेदवार आकाश पुरोहित यांना आव्हान देण्याचा प्रयत्न केला होता.

दैनिक युवाराष्ट्र दर्शन
३
यवतमाळ
शनिवार, १० जानेवारी २०२६
जिल्हा

## बँक प्रतिनिधीपदी प्रमोद क्षिरसागर यांची निवड.

•युवाराष्ट्र दर्शन वणी, प्रतिनिधी, दि.९ जानेवारी



शिक्षण प्रसारक मंडळसेवकांची सहकारी पतसंस्था वणी. या संस्थेच्या वतीने यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या प्रतिनिधीपदी अध्यक्ष प्रमोद क्षिरसागर यांची एकमताने निवड करण्यांत आली. यावेळी पतसंस्थेचे उपाध्यक्ष आनंद शोभने, सचिव दिलीप घोडमारे तसेच सदस्या इंदू सिंग, संगिता मेश्राम, शुभांगी नवघरे, रजनी गादेवार, वैशाली देशमुख, राजश्री कोंडावार व सचिन थेटे उपस्थित होते.

युवाराष्ट्र दर्शन
-: कार्यालयीन पत्ता :-
गुरुमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१
-: जिल्हा प्रतिनिधी :-
संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०
* एजन्सीसाठी संपर्क
ई-मेल ssawarkar43@gmail.com

### संक्षिप्त

## शॉक लागल्याने युवक ठार

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी यवतमाळ, दि. ९ जानेवारी

पिकांना पाणी देण्यासाठी गेलेल्या व्यक्तीचा विद्युत प्रवाहाने मृत्यू झाला आहे. फिर्यादी अविनाश अरुण नेवारे (३७) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा भाऊ अंकुश अरुण नेवारे (३५) हा १५ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री शेतात पाणी देण्यासाठी गेला होता. शेतात जंगली प्राण्यांच्या शिकारीसाठी त्याने स्वतःच विद्युत तारा लावल्या होत्या. अंधारात या तारांचा स्पर्श झाल्याने अंकुशला जोरदार करंट लागला आणि त्याचा जागीच मृत्यू झाला. या प्रकरणी वडगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# यवतमाळ न.प. उपाध्यक्षपदी दत्ता कुळकर्णी

### स्वीकृत सदस्यांमध्ये भाजपचे पंकज नानवाणी, रेखा कोठेकर, अमोल देशमुख, तर कॉंग्रेसकडून संतोष बोरेले, शिंदे गटाचे गजानन इंगोले यांची वर्णी

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ९ जानेवारी



भाजपाचे उपाध्यक्ष दत्ता कुळकर्णी यांचे अभिनंदन करतांना नगराध्यक्ष ॲड. उईके.







तब्बल तीन वर्षानंतर नगरपालिकेत पहिली सर्वसाधारण सभा शुक्रवारी (दि. ९) पार पडली. यावेळी बहुप्रतिक्षित उपनगराध्यक्षांची निवड करण्यात आली. भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक दत्ता कुळकर्णी यांची उपनगराध्यक्षपदी वर्णी लागली. तसेच यावेळी पाच स्वीकृत नगरसेवकांचीही निवड घोषित करण्यात आली.

यवतमाळ नगरपालिकेसाठी २० डिसेंबर रोजी मतदान झाल्यानंतर २१ मतमोजणी होऊन भाजपच्या ॲड. प्रियदर्शनी उईके नगराध्यक्ष म्हणून विजयी झाल्या. त्यानंतर थेट शुक्रवारी ९ जानेवारी रोजी नगरपालिकेची पहिली सर्वसाधारण सभा बोलवण्यात आली. सकाळी १० वाजता सुरू झालेल्या या सभेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष उईके होत्या. तर मुख्य कार्यकारी अधिकारी शुभम क्यातमवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपनगराध्यक्ष म्हणून भाजपचे दत्ता कुळकर्णी यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीची घोषणा नगराध्यक्षांनी करताच सभागृहातील सदस्यांनी टाळ्यांचा गजर केला. यवतमाळ पालिकेतील संख्याबळानुसार भाजपला तीन स्वीकृत नगरसेवक घेण्याची मुभा मिळाली. या तीन पदांसाठी रेखा कोठेकर, अमोल देशमुख आणि पंकज नानवाणी यांची निवड नगराध्यक्षांनी जाहीर केली. तर शिवसेना आणि कॉंग्रेसकडून संख्याबळाच्या आधारावर प्रत्येकी एक स्वीकृत नगरसेवक निवडण्यात आला. मात्र या दोन्ही पक्षातून एकापेक्षा अधिक अर्ज असल्याने नगराध्यक्षांनी त्या त्या पक्षाच्या गटनेत्याकडून एकच नाव मागविले. ही नावे देताच शिवसेनेकडून गजानन इंगोले आणि कॉंग्रेसकडून संतोष बोरेले यांची स्वीकृत सदस्य म्हणून घोषणा करण्यात आली. आता नगराध्यक्ष ॲड. प्रियदर्शनी उईके आणि उपनगराध्यक्ष दत्ता कुळकर्णी यांच्या नेतृत्वात नगरपालिकेच्या दैनंदिन कामाला गती येणार आहे.

#### ढोलताशासह फटाक्यांची आतषबाजी

**उपनगराध्यक्ष आणि पाच स्वीकृत सदस्यांची निवड होताच सभागृहात पेढे वाटप करून आनंद साजरा करण्यात आला. तर पालिकेच्या पुढे ढोलताशांचा गजर करून फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.**

## आ. बाळासाहेब मांगुळकर यांच्या प्रयत्नाने उमरसऱ्यातील पाणी प्रश्न मार्गी

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ९ जानेवारी



उमरसरा प्रभाग क्रमांक 28 छत्रपती सोसायटी विठ्ठल रुक्मिणी मंदिरात गेल्या अनेक वर्षापासून पाण्याचा प्रश्न भेडसावत होता परिसरातील नागरिकांच्या वतीने मंदिरात नैमित्तिक धार्मिक कार्यक्रम तसेच महाप्रसादाचे आयोजन केले जातात मंदिरात पाण्याच्या अभावी धार्मिक कार्यक्रम करण्याकरिता अडचण भासत होती मंदिरातील पाण्याचा प्रश्न कायमचा सोडविण्याकरिता परिसरातील नागरिकांनी तसेच भाविक भक्तांनी प्रदीप नस्करी, किशोर वानखडे यांना सुचित केले नागरिकांच्या व भाविक भक्तांच्या सूचनेची दखल घेत संबंधित मंदिरात नवीन विंधन (विहीर) हापसी करण्याकरिता प्रदीप नस्करी, किशोर वानखडे यांनी पाठपुरावा केला नवीन हापसी करण्याकरिता आमदार बाळासाहेब मांगुळकर यांना पत्र देण्यात आले आमदार मांगुळकर यांच्या विशेष सहकार्याने तसेच प्रदीप नस्करी, किशोर वानखडे यांच्या अथक परिश्रमाने छत्रपती सोसायटी मंदिरात नवीन हपशी करून सबमर्सिबल पंप, पाण्याची टाकी, नळ लावून देण्यात आले मंदिरातील पाण्याचा प्रश्न कायमचा सोडविल्याबद्दल परिसरातील नागरिकांनी तसेच भाविक भक्तांनी आमदार बाळासाहेब मांगुळकर, प्रदीप नस्करी, किशोर वानखडे यांचे आभार मानले.

## आजच्या काळात पत्रकारितेला अनेक आव्हाने- राजू धावंजेवार

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, वणी, दि. ९ जानेवारी



६ जानेवारी रोजी आधुनिक मराठी पत्रकारितेचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांच्या जन्मदिनी संपूर्ण महाराष्ट्रात मराठी पत्रकार दिन साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून वणी येथील शासकीय विश्रामगृहात जागृत पत्रकार संघटनेच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार राजू धावंजेवार बोलत होते. बाळशास्त्री जांभेकर यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमास जागृत पत्रकार संघटनेचे तालुकाध्यक्ष संदीप बेसरकर, सचिव मोहम्मद मुस्ताक यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपले विचार मांडताना राजू धावंजेवार म्हणाले की, आजच्या काळात पत्रकारिता करणे अत्यंत कठीण झाले आहे. अनेकदा जीवावर उदार होऊन पत्रकारिता करावी लागते. बातमी सर्वात आधी देण्याच्या स्पर्धेत असंख्य न्यूज पोर्टल्स निर्माण झाली असली, तरीही वृत्तपत्रांचे महत्त्व आजही कमी झालेले नाही. कारण बातमीची सत्यता तपासून, योग्य पडताळणी केल्यानंतरच ती वृत्तपत्रात प्रकाशित केली जाते, असे त्यांनी स्पष्ट केले. कार्यक्रमादरम्यान पत्रकारितेतील बदलते स्वरूप, वाढती आव्हाने व पत्रकारांची सामाजिक जबाबदारी यावरही चर्चा झाली. यावेळी पत्रकार दिनाचे औचित्य साधून ज्येष्ठ पत्रकार तथा जागृत पत्रकार संघाचे विदर्भ अध्यक्ष राजू धावंजेवार यांचा शाल व पुष गुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी संदीप बेसरकर, मोहम्मद मुस्ताक, पुरुषोत्तम नवघरे, आकाश दुबे, प्रशांत चंदनखेडे तसेच विवेक तोटेवार आदी पत्रकार उपस्थित होते.



## पायल येवले हिचा राष्ट्रीय नंदगवळी समाज संघटनेच्या वतीने सत्कार

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी यवतमाळ, दि. ९ जानेवारी

राळेगाव येथील झालेल्या मॅरेथॉन स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकाविणाऱ्या पायल संदीप येवले हिचा राष्ट्रीय नंदगवळी समाज संघटनेच्या वतीने श्रीकृष्ण फुलारी मंदिर यवतमाळ येथे भव्य सत्कार करण्यात आला समाजाचे भूषण ठरलेल्या हिने अनेक स्पर्धकांमध्ये प्रथम क्रमांक मिळवून एक विक्रम स्थापन केला यात तिला सायकल भेट देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी जिल्हा अध्यक्ष ओंकार चेके, सचिव सुभाष काकडे, चंद्रपाल कालोकार,विजय चावरे,अंकुश काकडे,सुखदेवराव साठे,पवन झामरे, राजु घाटोळ,संजय पाटील पैक,सुनील चेके,गुणवतराव चावरे,कु. पायल संदिप येवले, संजय पाटीलपैक, गोविंद काळे, संदिप येवले,केशवराव चेके,अभिमान काकडे, इत्यादी प्रामुख्याने उपस्थित होते.

## जात वैधतेसाठी अर्ज करण्यास 31 जानेवारीपर्यंत मुदतवाढ

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ९ जानेवारी

शैक्षणिक सत्र 2025-26 मधील सर्व प्रवेशित मागासवर्गीय, अनु. जाती, विजाभज, एसईबीसी, इमाव, विमाप्र राखीव प्रवर्गातील ११ वी व १२ वी विज्ञान शाखेतील प्रवेशित विद्यार्थ्यांना आपले जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी प्रस्ताव समितीकडे दि.31 डिसेंबर पर्यंत सादर करण्यासाठी मुदत होती, परंतु विद्यार्थ्यांना भविष्यात तांत्रिक पदवी प्रवेशाकरीता अडचणी येऊ नये म्हणून समितीमार्फत दि. 31 जानेवारी पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी सर्व इत्तत्ता 11 वी व 12 वी विज्ञान शाखेतील प्रवेशित विद्यार्थ्यांनी 31 जानेवारीपूर्वी आपले जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी प्रस्ताव समिती कार्यालयात सादर करावे, असे आवाहन समितीमार्फत करण्यात आले आहे.

## राजेंच्या सातारा येथे गुंजला आर्णीचा वऱ्हाडी स्वर

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, आर्णी, दि. ९ जानेवारी




स्वराज्याची राजधानी सातारा येथे संपन्न झालेल्या महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, शाखा-शाहापुरी आणि मावळा फौंडेशन,सातारा आयोजित आखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे ९९ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, सातारा येथे शेतकरी साहित्यीक विजय ढाले यांनी समाजाच्या विषमतेवर व्यवस्थेवर प्रहार करीत आपली काव्य रचना सादर करून उपस्थितांची वाहवा घेत दाद मिळवित समाजाला आरसा दाखवित रसिक श्रोत्यांची दाद मिळविली. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त कवी श्रीकांत देशमुख यांचे अध्यक्षतेखाली पार पडलेल्या कवी संमेलनात विजय ढाले यांनी समाजातील वाढतचाललेल्या विषमतेच्या दरीवर आपली कवीता सादर करीत समाजाला जागरूक करन्याचे काम केले. महाराष्ट्रातून व इतरही राज्यातून अनेक नामवंत कवी या संमेलनात आपली उपस्थिती दर्शविली यवतमाळ जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करीत विजय ढाले यांनी साहित्य संमेलनात आपली उपस्थिती दर्शवत अत्यंत प्रेरणादाई कवीता सादर केली. आपल्या सादरीकरणाच्या वेगळ्या शैलीसाठी संपुर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेले कवी विजय ढाले यांनी सादर केलेली रचना अक्षरशः रसिक श्रोत्यांच्या मनाला चटका लावून गेली.

या कवितेच्या माध्यवातून त्यांनी उपस्थितांचे मन जिंकले. श्रीकांत देशमुख व अखिल भारतीय महामंडळाच्या कार्यवाह सुनिता राजे पवार यांचे हस्ते शेतकरी साहित्यीक कवी विजय ढाले यांचा शाल व जाणता राजा शिव छत्रपती शिवाजी राजे यांची पुर्णाकृती शिल्प देऊन सन्मान करून सत्कार करन्यात आला. यवतमाळ जिल्ह्यातील या साहित्यीक सुपुत्राचे सर्व क्षेत्रातून कौतूक करण्यात येत आहे.

## मृतदेह फारीत बांधलेला आढळला

•युवाराष्ट्र दर्शन ढाणकी प्रतिनिधी. शेख इरफान, दि. ९ जानेवारी



बि ट रगाव पोलीस स्टेशन अं तर्गत येत असलेल्या मुरली बं धाऱ्याच्या परिसरात आज सकाळी एका फारीत बांधलेल्या अव स्थे त एका अज्ञात पुरुषाचा मृतदेह सापडल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून, हा हत्येचा प्रकार असावा असा प्राथमिक अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आज सकाळी काही स्थानिक नागरिक मुरली बंधाऱ्याच्या बाजूने जात असतांना त्यांना दुर्गंधी येऊ लागली. परिसरात पाहणी केली असता, पाण्याजवळ एक पोते दोरीने घट्ट बांधलेल्या अवस्थेत संशयास्पद रित्या पडलेले दिसले. नागरिकांनी तातडीने याची माहिती मुरली गावचे पोलीस पाटील यांना दिली पोलीस पाटील मिथुन राठोड यांनी स्थानिक पोलीस प्रशासनाला दिली.घटनेची माहिती मिळताच ठाणेदार पांडुरंग शिंदे, पोलीस उपनिरीक्षक सागर अन्नमवार, पोलीस शिपाई दत्ता कवडेकर, पोलीस शिपाई प्रवीण जाधव यांनी घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करून जेव्हा फारी उघडण्यात आले, तेव्हा त्यात एका अंदाजे ३० ते 32 वयोगटातील इसमाचा मृतदेह आढळून आला. आज्ञात इसमाचा अंदाजे 10 दिवसा पूर्वी खून करून मृतदेह नदी पत्रात फेकून देण्यात आल्याचे वर्तवले जात आहे. मृतदेहाची अद्याप ओळख पटलेली नाही. मृतदेह फारीत गुंडाळून असल्याने आणि त्यावर काही खुणा असल्याने, ही हत्या करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह येथे टाकण्यात आल्याचा संशय आहे. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदन नदी काठी डॉ. हांडे यांनी घटना स्थळी जाऊन केले .पोलीस आता परिसरातील बेपत्ता व्यक्तींच्या तक्रारींची पडताळणी करत आहेत.

## आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पोदार लर्न स्कूल,पुसदचे यश

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, पुसद, दि. ९ जानेवारी



विद्यालंकार्स पोदार लर्न स्कूल साठी तसेच संपूर्ण पुसदवासीयांसाठी अत्यंत अभिमानास्पद बाब म्हणजे शाळेतील विद्यार्थ्यांनी नेपाळ येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत दैदिप्यमान कामगिरी करत १३ सुवर्ण व १० रौप्य अशी एकूण २३ पदके पटकावली आहेत. ही आंतरराष्ट्रीय स्पर्धा TAFTYGAS व भारत सरकारच्या युवा व क्रीडा मंत्रालयाच्या संयुक्त विद्यमाने दि. ०३ जानेवारी ते ०७ जानेवारी २०२६ या कालावधीत नेपाळ येथे पार पडली. या स्पर्धेत भारतासह नेपाळ, श्रीलंका, भूतान, बांगलादेश आदी विविध देशांतील खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. विद्यालंकार्स पोदार लर्न स्कूलच्या २२ विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व केले. विशेष म्हणजे हे सर्व विद्यार्थी यापूर्वी यवतमाळ येथे झालेल्या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत विजेते ठरले होते. उत्कृष्ट कामगिरीच्या जोरावर त्यांची आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. विद्यालंकार पोदार लर्न स्कूल पुसदच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा एक वेळा हे सिद्ध करून दाखविले की, आम्ही अभ्यासासोबतच खेळातही अव्वल आहोत. शाळेमध्ये अभ्याससोबतच नियमित खेळाचेही विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीनुसार योग्य प्रशिक्षकाद्वारे मार्गदर्शन केल्या जाते आणि त्यामुळेच हे विद्यार्थी आज आंतरराष्ट्रीय स्तरावर आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करीत विविध पदकांचे मानकरी ठरले आहेत.

**व्हॉलीबॉल**

**१७ वर्षांखालील मुले – सुवर्णपदक**

आदित्य संतोष पवार, वरद संदीप शिंदे, साईराम अनिल करे, सुयश बालाजी कानडे, दिव्यम अमोल दळवी, नित्यम जनार्दन बावणे, अविष्कार अजय गरड, आरुष अमित भोपी, जय प्रकाश भोसले

**१४ वर्षांखालील मुले – रौप्यपदक**

कश्यप विनोद मनवर, आर्यन संतोष मारकड, अंश सुमित राठोड, सोहम प्रशांत पांडे, मयूर रणजित राठोड, गौरव इंदल चव्हाण

**बॅडमिंटन**

**१४ वर्षांखालील मुले – सुवर्णपदक**

रोहन रामदयाल चौधरी, मयंक उमेश राठोड

१७वर्षांखालीलमुले–रौप्यपदक राहुल रामदयाल चौधरी

**ॲथलेटिक्स**

**१४ वर्षांखालील मुले – सुवर्णपदक**

समर्थ अंकुश मारकड (१०० मीटर धावणे)

**१७ वर्षांखालील मुले सुवर्णपदक –**

नैतिक लक्ष्मण पोपळघाट (१०० मीटर धावणे)

**रौप्यपदक – जय महेंद्र कांबळे (लांब उडी)**

तायक्वांदो

१७ वर्षांखालील मुले – रौप्यपदक वरद संदीप शिंदे, सुशांत सतीश आढाव

या नेत्रदीपक यशामागे मुख्य प्रशिक्षक सुधाकर लिंबाजी खराटे यांचे मोलाचे मार्गदर्शन तसेच सहायक प्रशिक्षक ऋषिकेश अविनाश येरावार यांचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांच्या या अभूतपूर्व यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष शरद मैंद, सचिव सुरज डुबेवार, उपाध्यक्ष संतोष अग्रवाल, कोषाध्यक्ष मनिष अनंतवार, सहसचिव संगमनाथ सोमावार तसेच प्राचार्या राधा धागमवार, उप-प्राचार्या राखी तगडपल्लेवार, प्रशासकीय अधिकारी गोविंद निमडगे, समन्वयक सविता सुपे, सचिन मिसे, वृषाली खांबाडकर, शारिरीक शिक्षक सुधाकर खराटे, संदीप तासके व सुनील यादव तसेच शाळेतील सर्व शिक्षकवृंद व पालकांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले. या यशामुळे विद्यालंकार्स पोदार लर्न स्कूलने आंतरराष्ट्रीय स्तरावर शाळेचे, शहराचे व देशाचे नाव उज्ज्वल केले आहे.

## राष्ट्रीय युवा दिनानिमित्त 'संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा'

•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. 9 :

राष्ट्रीय युवा दिनाचे (12 जानेवारी) औचित्य साधून राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाबाबत जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने "संविधान जनजागृती प्रश्नमंजुषा २०२५ -२६" या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या राज्यस्तरीय उपक्रमाच्या माध्यमातून युवकांमध्ये संविधानातील मूल्ये, मूलभूत अधिकार व कर्तव्यांची जाणीव निर्माण करण्यावर भर देण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत सहभागी विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन स्वरूपात १५ दिवसांचे प्रशिक्षण राबविण्यात येणार असून, या प्रशिक्षणात संविधानासंबंधी सखोल माहिती व मार्गदर्शन दिले जाणार आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी १० जानेवारी २०२६ पर्यंत इच्छुक विद्यार्थ्यांनी नोंदणी करण्याचे आवाहन महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष धर्मपाल मेश्राम यांनी केले आहे. हा राज्यस्तरीय उपक्रम महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती व जमाती आयोग यांच्या वतीने राबविण्यात येत असून, भारतीय संविधानातील मूल्ये, मूलभूत अधिकार व कर्तव्यांची जाणीव युवकांमध्ये निर्माण करणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. युवकांनी संविधान समजून घेऊन जबाबदार, सजग आणि लोकशाही मूल्यांवर आधारित नागरिक म्हणून घडावे, यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. "घर घर संविधान" या संकल्पनेतून ही जनजागृती चळवळ राज्यातील प्रत्येक घरापर्यंत व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

युवाराष्ट्र दर्शन ७
वर्धा जिल्हा
शनिवार, १० जानेवारी २०२६

# डोंगरी, पहाडी भागात मोबाईल रेंज गुल, मोबाईल टॉवरची मागणी

## आदिवासी एकात्मिक विकास प्रकल्प अधिका-यांना गोरसेनेचे निवेदन



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**आर्वी, दि. ०९**

तालुक्यातील डोंगरी, पहाडी भागामधील मोबाईल रेज गुल होत असल्याने शासकीय डिजिटल् प्रणाली ठप्प पडली आहे. परिणामी ग्रामीण भागातील नागरीक त्रस्त झाले असुन या ठिकाणी मोबाईल टॉवरची उभारणी करावी, अशी मागणी गोरसेनेचे ज्ञानेश्वर राठोड यांच्या नेतृत्वात आदिवासी एकात्मीक विकास प्रकल्प अधिकारी यांच्याकडे तहसीलदाराच्या माध्यमातुन दिलेल्या निवेदनातुन केली आहे. मागणी मान्य न झाल्यास तिव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

धनोडी (बहादरपुर) सर्कल मधील पाचेगाव, कवाडी, गव्हानखेडी आदि गावे पहाडी व डोंगरी भागात वसलेली आहेत. या गावांमध्ये जास्तीत जास्त आदिवासी बांधव राहत असतात. स्वातंत्र्याच्या ६९ वर्षानंतर सुध्दा विकासाच्या दृष्टीने मागासलेलीच आहेत. भौतीक सुविधांचा अभाव असल्यामुळे नागरीक विकासापासुन कोसोदुर आहेत. अशातही शासकीय कारभाराचे डिजीटीलायझेशन झाले आहेत. याच माध्यमातुन योजनांची माहिती सामान्य नागरिकांपर्यंत पोहचवील्या जाते मात्र या परिसरात मोबाईल रेंज नसल्यामुळे नागरिकांना शासकीय योजनेचा लाभ तर मिळतच नाही शिवाय शासकीय कामापासुन सुध्दा वंचीत राहावे लागत आहे. अंगणवाडीची शासनाने निर्धारित केलेली ऑनलाईन कामे असो, विद्यार्थ्यांची, आशा वर्करची कामे असो अथवा स्वस्त धान्य दुकानातुन धान्य वितरणाची कामे आदिंमध्ये अडथळा निर्माण होत असल्याने कामे ठप्प पडली आहे.एवढेच नव्हे तर डिजीटल शिक्षण प्रणालीसुध्दा प्रभावीत झाल्यामुळे पहिली ते चौथी पर्यंतचे विद्यार्थी शिक्षणापासुन वंचीत होण्याच्या मार्गावर आहेत. अशी गंभीर परिस्थीती निर्माण झाली असुन यातुन सुटका करण्याकरीता शासनाने त्वरीत मोबाईल टावर उभारावा अशी मागणी गोर सेनेच्यावतीने निवेदन देवुन करण्यात आली आहे. निवेदन देतेवेळी मुकेश दुपारे, नरेश मरसकोल्हे, सुमित तिडगाम, अनिल येडमे, अतुल येडमे, विनोद राठोड, विजय खडतकार, अक्षय यावले, नितीन खैरकार, रवींद्र राठोड, प्रकाश राठोड, अजय राठोड, शैलेश तिडगाम, रवींद्र खंडारे, प्रभू श्रीराम, रमेश राठोड, यश तिड़गाम, शरद आहाके आदी उपस्थित होते.

# जल जीवन मिशन अंतर्गत प्रस्तावित कामांचा आमदार कुणावार यांनी घेतला आढावा



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**हिंगणघाट, दि. ०९**

गावागावातील पाणी प्रश्न वेळेत मार्गी लावून नागरिकांना दिलासा देणे हे प्रशासनाचे सर्वोच्च प्राधान्य असले पाहिजे, असे प्रतिपादन आमदार समीर कुणावार यांनी केले. सर्व संबंधित यंत्रणांनी परस्पर समन्वय साधून जबाबदारीने व प्रभावीपणे काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. तहसील कार्यालय, पंचायत समिती, यांच्या संयुक्त विद्यमाने आमदार समीर कुणावार यांच्या अध्यक्षतेखाली तसेच जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या प्रमुख उपस्थितीत पाणी टंचाई आढावा बैठक उपविभागीय कार्यालयात पार पडली. यावेळी ते बोलत होते.

या बैठकीत हिंगणघाट तहसील अंतर्गत येणाऱ्या सर्व गावांमधील संभाव्य पाणी टंचाईच्या परिस्थितीचा सखोल व गावनिहाय आढावा घेण्यात आला. येणाऱ्या उन्हाळ्यात ग्रामीण भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी कोणत्याही अडचणीला सामोरे जावे लागू नये, यासाठी आमदार समीर कुणावार यांनी संबंधित अधिकारी, ग्रामसेवक व कंत्राटदारांशी चर्चा करून तातडीच्या उपाययोजना, पर्यायी पाणीपुरवठा व्यवस्थेचे नियोजन व आवश्यक ठिकाणी दुरुस्तीची कामे तात्काळ पूर्ण करण्याबाबत स्पष्ट निर्देश दिले. सर्व कामांची अंमलबजावणी ठरावीक कालमर्यादेत करण्यावरही यावेळी भर देण्यात आला.

याच बैठकीत जल जीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या व प्रस्तावित कामांचाही गावनिहाय आढावा घेण्यात आला. प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे शुद्ध पाणीपुरवठा सुनिश्चित करण्यासाठी प्रलंबित कामे लवकर पूर्ण करण्याच्या सूचना देत या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्याबाबत आमदार कुणावार यांनी स्पष्ट भूमिका मांडली. आढावा बैठकीस उपविभागीय अधिकारी आकाश अवतारे, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जि. प. वर्धा येथील कार्यकारी अभियंता परांडे, तहसीलदार योगेश शिंदे, गटविकास अधिकारी सावसाकडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, सरपंच, ग्रामसेवक व संबंधित कंत्राटदार उपस्थित होते.

# पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्या अंतर्गत प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि ०९**

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व तलमले औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने प्लेसमेंट ड्राईव्ह रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये हिंगणा व बुटीबोरी येथील नामांकित कंपन्यांचा समावेश होता या भरती मेळाव्याला आयटीआय उत्तीर्ण झालेले प्रशिक्षण संस्थेचे माजी प्रशिक्षणार्थी सहभागी झाले होते.

या भरती मेळाव्यात घेण्यात आलेल्या मुलाखती अंतर्गत सनविजय इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेड, बुटीबोरी या कंपनीने २२ उमेदवारांची प्राथमिक निवड केली, सविता ऑटो इंडस्ट्रीज हिंगणा एमआयडीसी या कंपनीने ०७ उमेदवारांची निवड केली, सी.एफ.एम. न्यूबीओ हेल्थकेअर मिहान, खापरी या कंपनी द्वारा १७ उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली, स्पेस वूड ऑफिस सोल्युशन बुटीबोरी या कंपनीने एकूण १६ उमेदवारांची कंपनीच्या प्रतिनिधींद्वारे प्राथमिक स्तरावर या भरती मेळाव्या अंतर्गत निवड केलेली आहे.

जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त नीता अवघड व तलमले औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रदीप तलमले यांच्या मार्गदर्शनात पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान तलमले औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रदीप तलमले यांनी भूषविले.प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राचार्य रांगणे , नीता अवघड यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये मुलाखत फेरीतून ६२ उमेदवारांची कंपनीद्वारे प्राथमिक निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन संस्थेचे निदेशक ओमप्रकाश तिवारी यांनी केले तर आभार अतुल वरेकर यांनी मानले. मेळाव्याचे यशस्वी आयोजन करण्याकरिता संस्थेचे निदेशक प्रशिक गायकवाड, विठ्ठल डफ, नितीन विलायतकर, विक्रांत राऊत, आदित्य तडस, रमाकांत घ्यारे , कोमल मुडे , पल्लवी मरगडे, रोशन झाडे, राजेश मेश्राम यांनी तसेच जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# बस स्थानक प्रमुखांचा मनमानी कारभार

## कर्मचारी व प्रवाशांना नाहक त्रास

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०९**

हिंगणघाट बस स्थानकात सध्या बसेसची संख्या कमी असताना देखील स्थानक प्रमुखांकडून योग्य नियोजन न करता बस चालक व वाहकांवर अतिरिक्त फेऱ्यांचा ताण टाकला जात आहे. बस फेऱ्यांचे नियोजन करणे हे स्थानक प्रमुखांचे कर्तव्य असताना, वैयक्तिक मतभेदांपोटी काही विशिष्ट चालक व वाहकांना विनाकारण सतत अतिरिक्त फेऱ्या देऊन त्रास दिला जात असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांकडून केला जात आहे.

नियमांनुसार एका फेरीनंतर चालक व वाहक बदलणे आवश्यक असते. मात्र या नियमांकडे दुर्लक्ष करून त्याच कर्मचाऱ्यांकडून सलग फेऱ्या करून घेतल्या जात आहेत. यामुळे चालकांवर मानसिक व शारीरिक ताण येत असून अपघात होण्याचीही शक्यता नाकारता येत नाही.या मनमानी कारभाराचा परिणाम बससेवेवरही होत असून बस वेळापत्रकानुसार चालत नाहीत. परिणामी बस चालक, वाहक तसेच प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. संबंधित प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देऊन योग्य नियोजन करावे, अशी मागणी होत आहे.

### शेतीचा वाद, दाम्पत्यास केली मारहाण

**पुलगाव, :** शेतीच्या कारणातून झालेल्या वादात दाम्पत्यास शिवीगाळ करुन मारहाण केली, ही घटना दहेगाव (धांदे) गावात घडली, कृष्ण बाबाराव घोंगे हे घरी असताना संजय घोंगे व त्यांची पत्नी हे घरासमोर आले आणि शेताच्या वादातून शिवीगाळ करु लागले, कृष्णाने शिवीगाळ करण्यास हटकले असता संजय घोंगे व विजय घोंगे यांनी शिवीगाळ करत दगडाने मारले, तसेच, कृष्णाच्या पत्नीसही मारले, संजयची पत्नी निलिमानेही शिवीगाळ करुन मारले, याप्रकरणी पुलगाव पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला.

# पहिल्या खेलो इंडिया आदिवासी क्रीडा स्पर्धा

## राज्यस्तरीय चाचणीसाठी नाव नोंदणी करण्याचे आवाहन

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०९**

केंद्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा मंत्रालयामार्फत पहिल्या खेलो इंडिया आदिवासी क्रीडा स्पर्धा २० जानेवारी पासून छत्तीसगड राज्यात होणार आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याच्या निवड चाचण्या होणार असून जिल्ह्यातील पात्र व इच्छूक आदिवासी खेळाडूंनी सहभागासाठी आवश्यक कागदपत्रांसह नाव नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी आशा मेश्राम यांनी केले आहे.

या स्पर्धेत तिरंदाजी, ॲथेलेटिक्स, फुटबॉल, हॉकी, जलतरण, वेटलिफ्टिंग व कुश्ती अशा क्रीडा प्रकारांचा समावेश असणार आहे. आदिवासी युवक, युवतींना राष्ट्रीयस्तरावर आपले क्रीडा कौशल्य सादर करण्याची सुवर्णसंधी उपलब्ध होणार आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार संबंधित खेळाच्या एकविध खेळ राज्य संघटना प्रतिनिधींसोबत राज्यस्तरीय निवड चाचण्यांचे आयोजन करण्यात येणार आहे.राज्यस्तरीय निवड चाचणी ही थेट राज्यस्तरावर पुरूष व महिलांच्या खुल्या वयोगटात आयोजित करणार असून या चाचणीसाठी खेळाडू तसेच संघ पात्र ठरणार आहेत. अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा असे क्रीडा विभागाद्वारे कळविण्यात आले आहे.

# नशामुक्त जिल्हा अभियानांतर्गत कार्यक्रमाचे आयोजन



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०९**

. राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत मुलांचे व्यसनाधीनतेचे वाढते प्रमाण लक्षात घेता जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यात नशामुक्त जिल्हा अभियान राबविण्यात येत आहे. त्यानुसार रत्नीबाई विद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.सुमंत वाघ, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.स्वप्नील बेले यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा महिला बाल कल्याण विभाग, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तसेच शासकीय मुलांचे निरीक्षण गृह, बालगृह यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्याला तंबाखू मुक्त व नशा मुक्त करण्यासाठी रत्नीबाई विद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थांच्या वाढत्या व्यसनाधीनतेबरोबरच अंमलीपदार्थाचे वाढते प्रमाण लक्षात घेता शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना तंबाखू व तंबाखूजन्य तसेच अंमली पदार्थाचे आरोग्यावर होणारे दुष्परिणाम कसे होतात, या वयातील मुलांना व्यसनाची सवय कशी लागते आणि त्यांना या व्यसनापासून दूर ठेवण्याकरीता कोणते उपाय करण्यात यावे, याबद्दल सायकॉलॉजिस्ट राहुल बुचुंडे यांनी माहिती दिली.महिला बाल विकास विभागाच्या सुनंदा हिरुडकर यांनी बालकांच्या अधिकाराबाबत माहिती दिली. शासकीय मुलांचे बालगृह, निरीक्षण गृह येथील सुजाता देशमुख यांनी मुले बालगुन्हेगारीकडे कसे वळतात याबद्दल माहिती दिली. विधी सेवा प्राधिकरणच्यावतीने वैशाली मिसकील यांनी मुलांचे कायदेविषयक अधिकार याबद्दल माहिती दिली.कार्यक्रमाला राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमाच्या जिल्हा सल्लागार डॉ.नम्रता सलूजा, सामाजिक कार्यकर्ता हर्षद ढोबळे, मुख्यध्यापिका रेखाताई जुगनाके, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचलन सुषमा पाखरे यांनी केले तर आभार मीनल मिश्रा यांनी मानले.

# हिंदी विश्वविद्यालयाच्या २९व्या स्थापना दिनानिमित्त सांस्कृतिक संध्या कार्यक्रम




■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०९**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयाच्या २९व्या स्थापना दिनानिमित्त गुरुवार, ०८ जानेवारी रोजी विश्वविद्यालयाच्या वाचस्पती भवन प्रांगणात भव्य सांस्कृतिक संध्या कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात गीत, संगीत आणि नृत्याच्या रंगारंग सादरीकरणांनी संपूर्ण परिसर आनंदाने न्हाऊन निघाला. विविध विभागांच्या विद्यार्थ्यांनी भारताच्या लोकसांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडवत गीत, संगीत व नृत्याच्या सादरीकरणांतून देशाच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाची ओळख करून दिली. या प्रसंगी कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा, कार्यपरिषद सदस्य प्रो. सुरेंद्र दुबे, उत्तर प्रदेश हिंदी साहित्य संस्थेच्या उपाध्यक्षा अमिता दुबे, निवासी लेखक डॉ. क्षमा कौल व डॉ. भूषण भावे, कुलसचिव कादर नवाज खान आदी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकून घेतली. कार्यक्रमाची सुरुवात 'वंदे मातरम्' आणि 'वरदे वीणा वादिनी वरदे' या गीतांनी झाली. या कार्यक्रमात शास्त्रीय राग शंकरा, राजस्थानचे समूहगीत, खुशी लोधी व आशुतोष दुबे यांचे भरतनाट्यम, बिहारचे प्रसिद्ध लोकनृत्य सामा-चकेवा, झिझिया नृत्य, गोंड व कुर्मी नृत्य, प्रसिद्ध लावणी व कोळी नृत्य अशी अनेक आकर्षक व रंगारंग सादरीकरणे झाली. यासोबतच पंजाबच्या भांगडा नृत्याने प्रेक्षकांना ताल धरायला भाग पाडले.विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या या मनमोहक कार्यक्रमांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. लोकसंस्कृतीच्या विविध रंगांनी सजलेल्या या सांस्कृतिक संध्येच्या माध्यमातून हिंदी विश्वविद्यालयाने आपला २९वा स्थापना दिवस भारतीय सांस्कृतिक वारशासह अत्यंत उत्साहात साजरा केला. कार्यक्रमाचे संचालन डॉ. ओमप्रकाश भारती व विद्यार्थी मनीष तिवारी यांनी केले.

### युवकास चाकूने मारण्याची धमकी

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०९**

मित्रासोबत नाश्ता करण्यास गेलेल्या युवकाला शिवीगाळ करत चाकूने मारण्याची धमकी दिली, ही घटना महिला आश्रम परिसरात घडली, सुजल भलमे हा मित्रासोबत नाश्ता करण्यासाठी गेला असता नयन सुरेंद्र भलमे हा दुचाकीने आडवा झाला आणि विनाकारण वाद करत शिवीगाळ केली, शिवीगाळ करण्यास हटकले असता नयनने चाकू काढून फिरवला. मात्र, मित्राने तो वार हुकवला. काही वेळाने पुन्हा नयन याने सुजलला शिवीगाळ करत त्याच्या भावाला मारले,

याप्रकरणी शहर पोलिसात तक्रार दाखल केली आहे.

# अवैध बनावट सायलेंसर वाहतूक पोलिसांनी केले नाश



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

**वर्धा, दि. ०९**

रस्ता सुरक्षा सप्ताह निमित्ताने पोलीस अधिक्षक सौरभ अग्रवाल यांच्या मार्गदर्शनात वाहतूक नियंत्रण शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायदा कलम १९०(२)१९४फक्त, १९८ अन्वये बनावट सायलेंसर ज्यांचा आवाज ८० डेसिबल पेक्षा जास्त होते ज्यांच्या मोठा आवाजने इतर चालक व नागरिकांना त्रास होत होता ते १५० सायलेंसर हे वाहतूक पोलिसांनी मोटार वाहन कायदा अंतर्गत जप्त केलेले होते ते सायलेंसर न्यायालयाच्या आदेशानवये पंचासमक्ष रोलर खाली दाब देवून नाश केले.

ही कारवाई वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक विलास पाटील, पोलिस उपनिरीक्षक अमोल लगड, मंगेश येळणे, संजय भांडेकर, रियाज खान, दिलीप आंबटकर, प्रशांत करंजेकर, आशिष देशमुख, किशोर पाटील मुकेश राऊत, प्रदीप कोहळे यांनी आज १२ वा बजाज चौकात ही कार्यवाही केली.

सर्व वाहन चालकांना बिना परवाना सायलेन्सर बदल करू नये. मोठ्या आवाजचे सायलेंसर वापरू नये, फटाके फोडू नये अन्यथा कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी असे आवाहन करण्यात आले.

